PHV
मे.पांडुरंग हरी वैद्य
ज्वेलर्स
संजय मोरेश्वर पोतदार ग्रुप कंपनी
BIS
हॉलमार्क दागिने
M.T.N.L. रोड, मिडल क्लास सोसायटी, पनवेल
फोन : ०२२-२७४५४४११

Website : www.killeraigad.com
रायगड, ठाणे आणि नवी मुंबईचे अग्रेसर वृत्तपत्र
दैनिक
# किल्ले रायगड
संपादक : प्रमोद लक्ष्मण वालेकर
सोमवार खेरीज दररोज प्रसिध्द होणारे

विरेंद्र ज्वेलर्स
विरेंद्रकुमार रतनचंद बांठिया ज्वेलर्स
९१६ हॉलमार्कचे
दागिने सौंदर्याचं लेणं
४, महात्मा गांधी रोड, बाजारपेठ,
पनवेल-४१० २०६.फोन : ०२२-२७४५ १९८८
E-mail : virendrajewellers@mtnl.net.in

❑ वर्ष ५८ वे : अंक २५१ वा ❑ पनवेल ❑ गुरुवार दिनांक १२ जून २०२५ ❑ किंमत : २ रुपये मात्र E-mail:killeraigad@gmail.com

## महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असो. रायगड जिल्हा अध्यक्षपदी अँड. नागेश हिरवे



**पनवेल दि. ११ (प्रतिनिधी) : महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनचे रायगड जिल्हा अध्यक्ष म्हणून नवीन पनवेल येथील अॅडव्होकेट तथा पब्लिक नोटरी वकील श्री नागेश अरविंद हिरवे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**

महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष सय्यद सिकंदर अली, असोसिएशनचे कार्यकारी अध्यक्ष अॅड. यशवंतराव खराडे तसेच सचिव अॅड. प्रवीण नलावडे यांच्या सहीचे नियुक्तीपत्र अॅड. नागेश हिरवे यांना देण्यात आले आहे.अॅड. नागेश हिरवे हे रायगड जिल्ह्यात २०१२ पासून वकिली व्यवसाय करीत आहे. तसेच ते विधी सेवा समिती, पनवेल च्या पॅनलवर कार्यरत असून अनेक गरीब

▸ वृत्त पान ४ वर

# जिल्ह्यातील शाळांमध्ये १६ जूनला प्रवेशोत्सव

## पहिल्याच दिवशी विद्यार्थांना मिळणार पाठ्यपुस्तके व गणवेश

**अलिबाग, दि. ११ (प्रतिनिधी) : १६ जूनपासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होत असून, शिक्षण विभागाची जय्यत तयारी सुरु आहे. शाळेच्या पहिल्या दिवशी प्रवेशोत्सव राबविण्यात येणार असून, शाळांचा परिसर सजविण्यासोबत पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत, प्रभातफेरी, पुस्तके तसेच गणवेश वाटप करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.**

त्याचबरोबर एकही बालक शाळाबाह्य राहणार नाही याची काळजी घेतली जात असल्याची माहिती, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनिता गुरव यांनी दिली आहे.

रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषद तसेच अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना शासनाकडून पाठ्यपुस्तके देण्यात येतात. ही पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी मिळतील असे नियोजन करण्यात येत आहे. सरकारच्या बालभारती विभागाकडे शिक्षण विभागाने पुस्तकांची मागणी केली होती. सरकारकडून पुस्तके प्राप्त झाली असून, ही पुस्तके तालुक्याच्या गटशिक्षण अधिकाऱ्यांमार्फत केंद्रप्रमुख व केंद्रप्रमुखांच्या माध्यमातून मुख्याध्यापकांकडे सूपूर्द करण्यात येत आहेत. रायगड जिल्ह्यातील पहिली ते आठवीपर्यंतच्या १ लाख ८१ हजार ५४८ विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे तर ९८ हजार ५७२ विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात येणार आहेत.

जिल्ह्यात एकही शाळाबाह्य विद्यार्थी राहणार नाही या दृष्टीने शिक्षण विभागामार्फत पाऊले उचलण्यात येत आहेत. १६ जून रोजी शळा सुरु होणार आहेत. त्यापूर्वी ६ ते १४ वयोगटातील एकही विद्यार्थी शिक्षणापासून दूर राहू नये, यासाठी प्रवेश पात्र बालकांच्या याद्या ग्रामपंचायत व शाळा फलकावर प्रदर्शित करण्यात येणार आहेत. प्रवेश पात्र बालकाची यादी लाऊडस्पीकरवर घोषित करून शैक्षणिक पदयात्रा व शिक्षकांच्या गृहभेटी व सरपंच, गावकरी, व्यवस्थापन समिती सदस्य, युवक, बचतगट, ज्येष्ठ नागरिकांसह सर्वाच्या गृहभेटींचे नियोजन करण्यात आले आहे.

जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे पहिल्याच दिवशी स्वागत करण्यासाठी शाळांना

▸ वृत्त पान ४ वर

## उरणमधील नवनियुक्त न्यायाधिशांचे स्वागत



▸ वृत्त पान ४ वर

# कामगार नेते शाम म्हात्रे यांच्या पुण्यस्मरण दिनी महिला आरोग्य तपासणी शिबिर



**उरण दि. ११ (विठ्ठल ममताबादे ) : एक महिला जागृत झाली तर संपूर्ण कुटुंबाला कर्क रोगापासून दूर ठेवू शकते. आज देशात कर्करोग ( कॅन्सर) रोगाचे प्रमाण वाढत आहे. या रोगाचे रुग्ण आज मृत्यसी झुंज देत आहेत.**

या रोगाची लक्षणे प्रथम समजून आली तर कर्क रोगाला दूर ठेवू शकते यासाठी माझ्या माध्यमातून काहीसा प्रयत्न आज कामगार नेते शाम म्हात्रे यांच्या पुण्यस्मरण दिनी मी केला आहे असे मनोगत काँग्रेसच्या कामगार नेत्या श्रुती म्हात्रे यांनी पनवेल येथे व्यक्त केले.

काँग्रेसचे जेष्ठ नेते आणि कामगार नेते शाम म्हात्रे यांच्या सातव्या पुण्यस्मरण दिनी आगरी शिक्षण संस्था सेक्टर ६ खांदा कॉलनी पनवेल येथे त्या बोलत होत्या. त्यावेळी त्यांनी शाम म्हात्रे यांच्या अनेक कामगार चळवळींना उजाळा दिला. आज शाम म्हात्रे असते तर सिडको कामगारांचा श्रेय वादात अडकलेला जिव्हाळ्याचा प्रश्न निकाली निघाला असता. पण सिडकोचे कामगार हे माझ्या कुटुंब आहे.त्यांना न्याय देण्यासाठी माझी शेवट पर्यंत लढाई असेल. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा पाटील यांचे नाव देण्यात यावे ही पहिल्या प्रथम मागणी शाम म्हात्रे

▸ वृत्त पान ४ वर

# शिव प्रतिष्ठान आणि शिव प्रतिष्ठान महिला मंडळ यांच्या माध्यमातून शैक्षणिक साहित्य वाटप करून शिवराज्याभिषेक दिन साजरा

**उरण दि. ११ (विठ्ठल ममताबादे ): शिव प्रतिष्ठान आणि शिव प्रतिष्ठान महिला मंडळ यांच्या वतीने राज्यभिषेक सोहळ्याचे औचित्य साधून मुकरीची वाडी आणि लालवाडी करंजाडे मध्ये सामाजिक बांधिलकी जपत भव्य शालेपयोगी किट चे वाटप करण्यात आले.**



सदर उपक्रम मोठ्या उत्साहात व उत्तम प्रतिसादात संपन्न झाला.या मध्ये प्रामुख्याने मुलांना बॅग वह्या पेन पेन्सिल कंपास पेटी अश्या वस्तूंचे वाटत करण्यात आले.वस्तू मिळाल्याने विद्यार्थ्यांनी आनंद व समाधान व्यक्त केले.ह्या कार्यक्रमास महिला मंडळ पदाधिकारी सुषमा मयेकर, ज्योती टोटरे,प्रियांका ठाकूर, शिव प्रतिष्ठानचे अध्यक्ष सत्यजित पाटील, उपाध्यक्ष प्रशांत निर्मळ, संदीप पाटील, मनीष कटेकर, राकेश कुसले, सुनील अंबावडे, अविनाश ठोसर, प्रशांत शेट्टी, सुरेश बार्वे,अमर कुसळे,अमर सावंत, अक्षय मोरे,सिद्धार्थ अंबावडे,समीर कांबळे,राजेश शेलार आदी मान्यवर उपस्थित होते.शिव प्रतिष्ठान आणि शिव प्रतिष्ठान महिला मंडळ यांच्या माध्यमातून शैक्षणिक साहित्य वाटप करून शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आल्याने या आगळ्या वेगळ्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

Fossilex®
New Generation Lubricants & Speciality Oils, Greases
Petrol, Diesel, CNG & LPG Engine Oil
• Gear Oil & Transmission Oil
• Hydraulic Oils • Brake Oil • Coolant • Greases





DASHMILE LUBTECH
Dashmile Lubtech Pvt. Ltd.
Regd. Office: Plot No. 17/19, MIDC Taloja, Dist. Raigad - 410 208, Maharashtra
E-Mail: ashutosh.allapurkar@dashmile.in
Contact: +91-9137010867

PRINCE CREATIONS PVT.LTD.
Kids, Men's & Ladies Wear House of Readymade Garments.
PRINCE COLLECTION
(A Complete Family Showroom)
Shop No. 1/2/3/4 Prabhakar Raje Complex, Shivaji Chowk, Tal. Panvel, Raigad-410206.Ph. No. 022-27461001/27492002
Email- princecreation1001@gmail.com

PKB
पन्नालाल केशरचंद बांठिया
सोने, चांदीचे व्यापारी
७७६, एम.जी. रोड, पनवेल-४१० २०६, जि. रायगड.
फोन : ऑ. 2749 1303 ❑ नि. 2745 2326
पनवेल मधील सर्वात जुनी व खरी पेढी

# संपादकीय

## काळजी घेण्याची गरज

ऑपरेशन सिंदूर'मध्ये पाकिस्तानला आपण धडा शिकवला. या मोहिमेत चीनी शस्त्रास्त्रांचे पितळ उघडे पडले, हे सर्व खरे आहे. त्या काळात तुर्कस्तान वगळता उघड उघड कुणीही पाकिस्तानची तळी उचलली नाही; परंतु त्यानंतर घडलेल्या अनेक घटना परस्परांशी जोडून पाहिल्या, तर भारताने चिंता करावी, अशी स्थिती आहे. ऑपरेशन सिंदूर'दरम्यान भारताने अफगाणिस्तानवर हल्ला केला, अशी अफवा पाकिस्तानने उठवली, ती अफगाणिस्तानने खोडून काढली. अफगाणिस्तानच्या परराष्ट मंत्र्यांशी भारताच्या परराष्ट्रमंत्र्यांनी चर्चा केली. दोन्ही देशांचे संबंध सुधारत असल्याचे चित्र निर्माण झाल्याने काही दिवसांतच ते आभासी होते, असे स्पष्ट झाले. बांगला देश, अफगाणिस्तान आणि चीनच्या परराष्ट्र मंत्र्यांची भेट बीजिंगमध्ये झाली. त्यात काही करार झाले. या तीन देशांनी एकत्र येणे हे भारतासाठी चांगले नाही. गेल्या वर्षापासून बांगला देश भारताचा मित्र राहिला नाही. तो पाकिस्तान, चीनच्या आहारी चालला आहे. बांगला देशाच्या निवडणुकीबाबत शंका घेणारी आणि भारताला मित्र समजणारी अमेरिका आणि तिच्या अध्यक्षांची भूमिका भारताची अडचण वाढवणारी आहे. एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मित्र म्हणायचे आणि दुसरीकडे पाकिस्तान आणि बांगला देशाला मदत होईल, अशी धोरणे घ्यायची, अशी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची दुटप्पी भूमिका आहे. पाकिस्तानने भारतात दहशतवादी घुसवून २६ पर्यटकांची हत्या केली. त्यानंतरही अमेरिकेने पाकिस्तानला जागतिक नाणेनिधीतून मदत केली. दहशतवादी कृत्यानंतरही फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्स' (एफएटीएफ)मधून पाकिस्तानला वगळण्यात आले. आणखी एक विसंगत बाब म्हणजे दहशतवाद्यांना पोसणाऱ्या पाकिस्तानला संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेत महत्त्वाचे पद देण्यात आले आहे. पहलगाम हल्ला आणि त्यानंतर भारताच्या ऑपरेशन सिंदूर'मुळे अलिकडच्या काळात दक्षिण आशिया जगभरातील माध्यमांमध्ये मथळ्यांमध्ये आहे. अमेरिकेपासून ब्रिटनपर्यंत, आफ्रिकन खंड आणि दक्षिण अमेरिकन देशांपासून ते युरोपीयन देशांपर्यंत आणि आशियातील इतर देशांनी भारत आणि पाकिस्तानमधील युद्धसदृश परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त केली आहे; पण थोडे बारकाईने पाहिले तर, भारत आणि पाकिस्तानमधील लष्करी तणावाच्या सध्याच्या परिस्थितीव्यतिरिक्त दक्षिण आशियात बरेच काही घडत आहे.

जागतिक शक्ती ज्या प्रकारे या संपूर्ण प्रदेशात सक्रियता दाखवत आहेत, अशी परिस्थिती गेल्या शतकाच्या सातव्या दशकातच दिसून आली होती. त्या वेळी, अमेरिका आणि रशियामधील स्पर्धेचा परिणाम दक्षिण आशियात दिसून आला होता आणि आता चीनने रशियाची जागा घेतली आहे. अफगाणिस्तानपासून बांगला देशापर्यंत अमेरिका आणि चीनमध्ये बुद्धिबळाचा पट रचला जात आहे. खेळ नुकताच सुरू झाला आहे आणि तो कोणत्या दिशेने वळेल हे स्पष्ट नाही; परंतु निकाल काहीही असो, त्याचा भारतावर मोठा परिणाम होईल हे निश्चित आहे. एकीकडे, भारत आणि पाकिस्तानमध्ये क्षेपणास्त्र लढे सुरू होते, तर दुसरीकडे भारत आणि बांगला देश एकमेकांच्या आर्थिक हितांविरुद्ध पावले उचलत होते. प्रथम बांगला देशने जमिनीच्या मार्गाने भारतीय धाग्याची आयात करणे थांबवले, नंतर भारताने जमिनीच्या मार्गाने भारत आणि इतर देशांमध्ये बांगला देशात बनवलेल्या तयार कपड्यांच्या निर्यातीवर बंदी घातली. एकीकडे हे सुरू असताना बांगला देश आणि अमेरिकेतील लष्करी सहकार्य वाढू लागले आहे. बांगला देशातील कॉक्स बाजार येथे बांगला देश सैन्य, अमेरिकन सैन्य आणि हवाई दलाचा लष्करी सराव सुरू आहे. जरी हा सराव नागरी महत्त्वाचा असला, तरी त्याचा अर्थ खोलवर आहे. तो म्यानमारच्या सध्याच्या अंतर्गत परिस्थितीशी जोडलेला आहे. म्यानमारमधील लष्कराचा प्रभाव कमी होत आहे. त्या देशातील अनेक भाग बंडखोर गटांनी ताब्यात घेतले आहेत. अमेरिका या बंडखोर गटांना पाठिंबा देण्याची योजना आखत आहे. असे करून, ती लष्करी शासक आणि पंतप्रधान मिन आंग ह्वाइंग यांच्यासाठी परिस्थिती कठीण करू इच्छिते; परंतु खरे लक्ष्य चीन आहे, जो सतत लष्करी हुकूमशहाला पाठिंबा देत आहे. म्यानमारमधील अमेरिकेची वाढती आवड ही संयुक्त राष्ट्रांच्या म्यानमारच्या राखाइन प्रांतासाठी मानवतावादी आधारावर कॉरिडॉर बांधण्याच्या प्रस्तावाशीदेखील जोडली जात आहे. हा कॉरिडॉर बांधण्यासाठी अमेरिकेला बांगला देशाची मदत हवी आहे. असे म्हटले जात आहे, की हा कॉरिडॉर राखाइन प्रांताला मानवतावादी मदत पुरवण्यास, रोहिंग्यांचे पुनर्वसन करण्यास मदत करेल. बांगला देशाच्या काळजीवाहू सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूसदेखील यासाठी तयार आहेत; परंतु बांगला देश सैन्याचे म्हणणे आहे, की इतका मोठा निर्णय लोकशाही सरकारने घ्यावा. चीनच्या वाढत्या वर्चस्वामुळे चिंतेत असलेली अमेरिका बंगालच्या उपसागरात आपल्या हितसंबंधांनुसार विस्तार करू इच्छिते.

आतापर्यंत समोर आलेल्या माहितीवरून असे दिसून येते, की अमेरिकन सरकारने म्यानमारबाबत तयार केलेल्या नवीन धोरणात भारताशी कोणतीही चर्चा झालेली नाही. इंडो-पॅसिफिक' प्रदेशात चीनच्या वाढत्या कारवाया रोखण्यासाठी अमेरिका भारताला आपला महत्त्वाचा धोरणात्मक भागीदार मानत असली, तरी भारताच्या शेजारी चीनच्या प्रभावाला आव्हान देण्यासाठी बनवल्या जाणाऱ्या धोरणात भारताची कोणतीही भूमिका नाही. भारत या संपूर्ण परिस्थितीवरही लक्ष ठेवून आहे. पहिले कारण म्हणजे बांगला देशपासून म्यानमारपर्यंत अमेरिकेच्या वाढत्या कारवाया त्याच्या दीर्घकालीन हितसंबंधांशी सुसंगत नाहीत. मोहम्मद युनूसच्या सरकारने आधीच भारतविरोधी भूमिका घेतली आहे. जर अमेरिका म्यानमारच्या मोठ्या भागात लष्करी बंडखोरांना मदत करत असेल आणि त्यांना शस्त्रे इत्यादी पुरवत असेल, तर भविष्यात ते भारताच्या हितसंबंधांना हानी पोहोचवू शकते. ईशान्येकडील भागात सक्रिय असलेल्या दहशतवादी संघटनांचे म्यानमारच्या लष्करी बंडखोरांशी जुने संबंध आहेत. अशा परिस्थितीत, लष्करी बंडखोरांना उपलब्ध असलेले दारूगोळा, शस्त्रे इत्यादी ईशान्येकडील राज्यांच्या अतिरेकी संघटनांच्या हाती जाण्याचा धोका आहे. भारत सरकार चीन समर्थित म्यानमारच्या लष्करी हुकूमशहाच्या बाजूने नसले, तरी लष्करी बंडखोर आणि लष्करी हुकूमशहा यापैकी एक निवडण्याचा पर्याय मिळाला, तर भारत निश्चितच सध्याच्या लष्करी सरकारसोबत जाईल. गेल्या एक वर्षात भारताने मिन आंग ह्वाइंग यांच्या लष्करी सरकारशी खूप विचारपूर्वक संपर्क वाढवला आहे. एप्रिल २०२५ च्या सुरुवातीला, थायलंडमध्ये झालेल्या बिमस्टेक परिषदेदरम्यान मोदी यांनी लष्करी शासक ह्वाइंग यांच्याशी द्विपक्षीय बैठक घेतली. म्यानमारशी संपर्क वाढवून भारताने ईशान्येकडील दहशतवादाला आळा घालण्याचा प्रयत्न केला आहे. गेल्या शतकाच्या सातव्या दशकात रशियन सैन्याच्या आगमनापासून ते अफगाण टोळीला अमेरिकेची मदती देण्यापर्यंत पाकिस्तानची भूमिका निर्णायक राहिली आहे.

अमेरिकन सैन्याने ऑगस्ट २०२१ मध्ये अफगाणिस्तान सोडण्याचा निर्णय घेतला. तालिबान सरकार पुन्हा परत आले. या काळात अफगाणिस्तानमध्ये आपला दूतावास सुरू करणारा एकमेव देश होता, तो म्हणजे चीन. तालिबान सरकारचे सध्या चीनशी सर्वात जवळचे संबंध आहेत. चीनची नजर अफगाणिस्तानच्या खनिज साठ्यावर आहे. चीन अफगाणिस्तानला सर्व प्रकारची मदत करत आहे आणि त्याच वेळी तेथील लिथियम आणि तांबे खनिज साठ्यांमध्ये गुंतवणूक वाढवत आहे. चीनी कंपन्या सतत अफगाणिस्तानला भेट देत आहेत. अमेरिका अफगाणिस्तानातील चीनच्या सक्रिय भूमिकेबद्दल चिंतेत आहे आणि आता ती तालिबानशी संबंध विकसित करण्यास तयार असल्याचे संकेत देऊ लागले आहेत. असे मानले जाते, की अमेरिकेला असेही वाटते, की चीनने पाकिस्तानप्रमाणे अफगाणिस्तानातील मौल्यवान खनिजे ताब्यात घेऊ नयेत. भारताचे हीतदेखील थेट अफगाणिस्तानातील परिस्थितीशी जोडलेले आहे. म्हणूनच, तो पारंपारिक विचारसरणी बदलून तालिबानशी संबंध सुधारत आहे. दुसरीकडे, अफगाण तालिबान सरकारचे पाकिस्तानशी असलेले संबंध खूपच कटू आहेत. त्यामुळे येथेही चीन दोन्ही देशांमध्ये मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करत आहे.

# आयपीओ व इंडेक्स ट्रेडींग गुंतवणुकीच्या नावाखाली ४.७१ कोटींची सायबर फसवणूक, दोन आरोपी अटकेत

**नवी मुंबई दि. ११(वार्ताहर) : आयपीओ व इंडेक्स ट्रेडींग मधील गुंतवणुकीत अधिक नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत ४ कोटी ७१ लाख ६५ हजार रुपयांची सायबर फसवणूक करणाऱ्या टोळीतील दोन आरोपींना नवी मुंबईच्या सायबर पोलिसांनी अटक केली आहे. या गुन्ह्यातील आरोपींचा महाराष्ट्रासह देशभरातील अन्य राज्यातील १० सायबर फसवणूक प्रकरणात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानुसार सायबर पोलिसाकडुन या आरोपींची कसुन चौकशी करण्यात येत आहे.**

या प्रकरणात फसवणुक झालेले ७० वर्षीय ज्येष्ठ नागरीक वाशीमध्ये राहण्यास असून ते मंत्रालयातील सेवानिवृत्त अधिकारी आहेत. गत ३० नोव्हेंबर २०२४ रोजी या ज्येष्ठ नागरिकाने शेअर्समध्ये गुंतवणुकीबाबत फेसबुकवर आलेली जाहिरात पाहून त्यात आपली माहिती भरली होती. त्यानंतर सायबर टोळीने त्यांना संपर्क साधुन एका व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये सहभागी करुन घेतले होते. त्यानंतर या टोळीने त्यांना आयपीओ व इंडेक्स ट्रेडींगमध्ये अधिक लाभ मिळवून देण्याचे आश्वासन देत त्यांचा विश्वास संपादन केला होता. त्यानंतर या टोळीने गुंतवणुकीसाठी विविध बँक खात्यांवर रक्कम पाठवण्यास सांगून त्यांच्याकडुन चार महिन्यामध्ये ४ कोटी ७१ लाख ६५ हजार रुपये उकळून त्यांची फसवणूक केली होती. त्यानंतर या ज्येष्ठ नागरीकाने सायबर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली होती.

त्यानंतर सायबर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कदम व पोलीस उपनिरीक्षक रोहित बंडगर यांच्या पथकाने तांत्रिक तपास व या गुन्ह्यातील बँक खात्याचे विश्लेषण केले असता, काही रक्कम करंजाडे येथे राहणारा इस्टेट एजंट विकास प्रकाश गव्हाणे (२७) याच्या खात्यात गेल्याची माहिती मिळाली. सदर माहितीच्या आधारे पोलिसांनी विकासला अटक केली. त्याच्या चौकशीत वाशिम जिल्ह्यातील मनोज विष्णु कालापाड (२२) याच्या सांगण्यावरुन त्याने त्याचे बँक खाते दिल्याचे आढळून आले. त्यानुसार पोलिसांनी वाशिम येथून मनोज कालापाड याला देखील अटक केली. या दोन्ही आरोपींना ४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. सायबर पोलिसांनी आता या गुन्ह्यातील इतर आरोपींचा शोध सुरु केला आहे.

आर्थिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कदम, पोलीस उपनिरीक्षक रोहित बंडगर, पोलीस हवालदार विजय आयरे, संदेश गुजर, पोलीस शिपाई भाऊसाहेब फटांगरे, नितेश म्हात्रे आणि महिला पोलीस शिपाई पुनम गडगे यांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. सायबर गुन्ह्यांपासून नागरिकांनी सावध राहावे, अशा प्रकारच्या जास्त नफ्याच्या आमिषांना बळी न पडता कोणतीही आर्थिक देवाणघेवाण करण्यापूर्वी खात्री करावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# तलावात आढळला महिलेचा मृतदेह

**पनवेल दि. ११ ( संजय कदम ) : उलवे परिसरातील असलेल्या तलावातील पाण्यामध्ये एका महिलेचा मृतदेह आढळून आला असून तिच्या नातेवाईकांचा शोध उलवा पोलीस करीत आहेत.**

सदर महिलेचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे, केस लहान काळे (विखुरलेले), डोळे उघडया स्थितीत, तोंड उघडे व जीभ बाहेर आलेली, चेहरा गोल, बांथा मध्यम, नेसणीस गडद निळा रंगाचा कुर्ता त्यावर फुलांची डिझाईन असलेली, फिकट लाल रंगाचा गमचा सदृश्य टॉवल, काळी तपकिरी लाल रंगाची फुला- फुलांचा पायजमा आणि डाव्या पायात एक निळ्या रंगाची स्लिपर घातलेली आहे. या महिला बद्दल कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी उलवा पोलीस ठाणे मो. ८६६९७८९१०० किंवा सहा. पोलीस निरीक्षक अजित कणसे यांच्याशी संपर्क साधावा.


रायगड जिल्हा आणि नवी मुंबईचे अग्रेसर वृत्तपत्र

किल्ले रायगड

सर्व प्रकारच्या जाहिरातींसाठी एक सर्वोत्कृष्ठ प्रभावी माध्यम

प्रदिप वालेकर ९८१९४७०१४०

प्रमोद वालेकर ९८६९६८८४५३


# जाहीर नोटीस

आमचे अशिल श्री विजय लक्ष्मणराव त्रिभुवन, रा. प्लॅट नं. १०२ ए. विंग सिमरन रेसिडन्सी को. हौ. सोसायटी, प्लॉट नं. २१, सेक्टर-७ खारघर, ता. पनवेल, नवी मुंबई (मोबाईल नं. ०९००४२३५७७७) यांनी सांगीतले वरून व दिलेल्या माहीतीवरून या जाहीर नोटीसीने तमाम लाकांस कळविते की,

खालील परिशीष्ठात नमुद मिळकती आमचे अशिलांनी १. प्रभाकर विठ्ठल बोरकर, २. कासम कादीर नागरी, ३. ईब्राहीम फिदाहुसेन लकडवाला, यांचे कडुन दि. २८/०३/२००२ रोजीचे कराराने खरेदी केल्या असून मोबदल्यापोटी बरीचशी रक्कमही त्यांना अदा केली आहे. मात्र करारांत नमुद केलेप्रमाणे त्यांनी अटी व शर्तीचे पालन केलेले नाही तसेच त्यांचे निधन झाल्यानंतरही त्यांचे सर्व वारसदारांची नावे मिळकतीला लावलेली नाहीत. त्याबाबत आमचे अशिल हे वेळोवळी त्यांचे संपर्कात होते व आहेत. आमचे अशिल हे सदरहु वारसांनी सर्व अटी व शर्तीचे पालन केल्यानंतर खरेदीखताचे वेळी उर्वरीत मोबदल्याची रक्कम त्यांना अदा करून खरेदीचा व्यवहार पुर्ण करण्यास नेहमीच तयार होते आणि आहेत.

तरी सदरहु मिळकतीबाबत आमचे अशिलांचे लेखी संमत्ती शिवाय अन्य कोणीही कसल्याही प्रकारचा व्यंवहार करु नये, सदरहु नोटीसीउप्परही कोणताही करार अगर व्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यास, तो बेकायदेशीर ठरणारा असुन तो आमचे अशिलांवर बंधनकारक ठरणारा नसुन, त्याकरीता आमचे अशिल हे योग्य व आवश्यक ती कारावाई करावी लागेल व होणाऱ्या परिणामांची सर्वस्वी जबाबदारी सदर व्यवहार करणारे यांचेवरच राहील नोंद घ्यावी. कळावे.

**परिशिष्ठ**

मौजे गुंडगे, ता. कर्जत, जि. रायगड येथील व तुकडी व रायगड जिल्हा परिषद आणि कर्जत नगरपरिषदेच्या हद्दीतील महसुल दप्तरी खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत

**- मिळकतीचे वर्णन -**

मौजे गुंडगे, ता. कर्जत, जि. रायगड येथील....

| सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ४०/४ | ०.११.० | ०.१६ |
| ४०/६ | ०.१६.० | ०.२७ |
| ४३/२१ | ०.६०.०<br>०.०४.०<br>एकुण ०-६४.० | ०.३७ |
| ४३/१७ | ०.४७.०<br>०.०२.०<br>एकुण ०-४९.० | ०.३४ |
| ४३/२६ | ०.०९.०<br>०.०१.०<br>एकुण ०-१०.० | ०.१२ |
| ४४/२ | ०.०६.०<br>०.०१.०<br>एकुण ०-०७.० | ०.०६ |
| ४६/११ | ०.०६.०<br>०.०१.०<br>एकुण ०-०७.० | ०.०५ |
| ६३/५ | ०.०३.५ | ०.०५ |
| ६३/१३ | ०.१५.०<br>०.०३.०<br>एकुण ०-१८.० | ०.१९ |
| ६३/१९ | ०.७१.०<br>०.१६.०<br>एकुण ०-८७.० | ०.६५ |

ठिकाण : पनवेल
दिनांक : १२/०६/२०२५

**ॲड. वसुधा शशिकांत पाटील**
**कल्याणी को. ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी लि., रुम नं. ३०४, प्लॉट नं. ४६, से. ५, करंजाडे, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६**

# उरण शहर भाजपा युवा अध्यक्ष निलेश पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

उरण दि. ११ ( दिनेश पवार ) : उरण शहर भाजप युवा अध्यक्ष निलेश ( जय हरी ) पाटील यांचा वाढदिवस सोमवार ( दि. ११) आमदार महेश बालदी संपर्क कार्यालयात मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



या वेळी भाजप नेते रवी भोईर, उरण शहर भाजप अध्यक्ष तथा माजी नगरसेवक कौशिक शहा, भाजप उरण तालुका सरचिटणीस सुनील पाटील, माजी नगरसेवक राजेश ठाकूर, अभय घरत ,समीर कुथे व भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

# जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे. पुष्पक दापोली, ता. पनवेल, जि रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या मिळकतीचे सर्व हक्क माझे अशिल श्री. सुरेश विलास खैरे, श्री. रमेश गणपत नाचरे, श्री. सिध्दार्थ अर्जुन रोटे, श्री हर्षवर्धन विश्वनाथ बोर्डे, यानी सिडको महामंडळाकडुन रितसर हस्तांतरण परवानगी मिळवुन मे. वेंकटेशा रियल्टी तर्फे भागीदार श्री अविनाश डी जगदाळे व श्री मनोज जयसिंग डोंगरे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे

**: मिळकतीचे वर्णन :**
**मौजे पुष्पक दापोली, ता. पनवेल, जि. रायगड**

| भुखंड क्र. | सेक्टर | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|
| २९४, २९४/अ | ३ | २७०<br>६०<br>३३० |

वर वर्णन केलेली मिळकत सिडको महामंडळाने कै. हरी गोमा पाटील यांचे वारस श्रीमती कांचन हरी पाटील, चंद्रकांत हरी पाटील, गणेश हरी पाटील, चाहू हरी पाटील, अरविंद बाळाराम पाटील यांचे नावे भाडेतत्वावर दिलेली आहे. सदर मिळकतीचे सर्व हक्क हस्तांतरणाबाबत मे. वेंकटेशा रियल्टी तर्फे भागीदार व श्रीमती कांचन हरी पाटील व इतर यांचेमध्ये दि १२/०९/२०२३ रोजी समझोता करार झाला आहे. तरी मे. वेंकटेशा रियल्टी कडे वर नमुद भुखंडाचे सर्व हक्क हस्तांतरित झालेनंतर माझे अशिलाने सदर मिळकत त्यांचेकडून खरेदीखताव्दारे विकत घेण्याचे ठरविले आहे.

वरील मिळकती बाबत अन्य कोणाचाही गहाण, दान, बोजा, बक्षिस, साठेकरार, विकसनकरार, फरोक्त, ट्रस्टी, पोटगी, वारसा भाडेपट्टा, वहीवाट व तत्सम कोणत्याही प्रकारचे दस्ताने कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित आहे, असे समजण्यात येऊन सदरहू मिळकती संदर्भात माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. सदर दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण: पनवेल
तारीख : १२/०६/२०२५

सही/-
**सौ.शारदा उत्तम पिंजारी**
ॲडव्होकेट व नोटरी
ऑफिस : ११ व १२, सत्य साई प्लाझा, सेक्टर-११, नवीन पनवेल. ४१०२०६ फोन नं.- २७४८२१८७

मा. बोराडे कपूर सो.
प्रो. जमा १००

# जाहीर नोटीस

ॲड. सर्जिल शेख

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**

**दिवाणी चौ.अर्ज क्र. ४३५/२०२५ नि. ७/ड, ने.ता. १०/०६/२०२५**

१. मोहम्मद अलिम अब्दुल करीम वसईकर
वय - २७ वर्षे, धंदा - व्यवसाय
२. मोहम्मद अजीम अब्दुल करीम वसईकर
वय - २४ वर्षे धंदा - व्यवसाय
३. रवियाबी मोहम्मद इक्बाल शेख
वय - ७४ वर्षे, धंदा - गृहीणी
वरील १ ते ३ राहणार प्लॉट क्र.१७/जे/४, रोड क्र २, शिवाजी नगर, गोवंडी, मुंबई ४०००४३ } **अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** **सामनेवाला**

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

१. कै. नाजमुन्नीसा अब्दुल करीम वसईकर यांचा मृत्यु कै. नाजमुन्नीसा अब्दुल करीम वसईकर यांचे दिनांक २३/०५/२०१३ रोजी प्लॉट क्र.१७/जे/४, रोड क्र.२, शिवाजी नगर, गोवंडी, मुंबई येथे झालेला आहे वरीलपैकी अर्जदार हे कै. नाजमुन्नीसा अब्दुल करीम वसईकर यांचे कायदेशीर वारस आहेत.

२. कै. निजामुन्नीसा अब्दुल करीम वसईकर यांनी त्यांच्या मृत्युपुर्वी त्यांचा ५०% हिस्सा असलेली सदनिका क्र. २०४, दुसरा मजला, एफ विंग, साईनगर, प्लॉट नं. २६, सेक्टर ०४, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड, क्षेत्रफळ ४२.१५ चौ. मी. बिल्टअप ही निवासी सदनिका दिनांक २४/०७/२००६ रोजी, दुय्यम निबंधक उरण (पनवेल २) सो. यांचे कार्यालयात दस्त क्र. पनवेल ४५११/२००६ अन्वये नोंदणीकृत करण्यात आलेल्या करारनामा (AGREEMENT FOR SALE) द्वारे कायमखरेदी केलेला आहे. सदर फ्लॅट हा कै. निजामुन्नीसा अब्दुल करीम वसईकर यांच्या नावे आहे.

३. सदर वरील वर्णनित स्थावर मिळकतीतील अपार्टमेंट बाबत कै. नाजमुन्नीसा अब्दुल करीम वसईकर यांचे वारस असल्यामुळे वरील अर्जदार यांनी मे दिवाणी न्यायालय, पनवेल यांचे कोर्टात वारस दाखला मिळणेकरीता सदर अर्ज दाखल केला आहे.

४. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीमधील अपार्टमेंट करिता अन्य कुणाचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासुन ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे. कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होऊन लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यास मे. कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेऊन मे. कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

पनवेल
दिनांक : ०७/०५/२०२५

**लिपिक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर, पनवेल**

# NOTICE

Notice is hereby given by **Vastu-Infrastructure for Residential cum commercial development at plot no. 16/3, Panvel, Raigad, Maharashtra by M/s. Vastu Infrastructure.** The project has been granted Environmental Clearance under letter no. EC22B038MH 191510 (SIA/MH/MIS/237251/2021), dated April 15, 2022. A copy of the clearance letter is available on the official website of PARIVESH at https://parivesh.nic.in/.

# सूचना

वास्तु इन्फ्रास्ट्रक्चर कडून रायगड, पनवेल येथील भूखंड क्रमांक १६/३ येथे निवासी आणि व्यावसायिकविकासासाठी वास्तु-पायाभूत सुविधा. या प्रकल्पाला १५ एप्रिल २०२२ च्या पत्र क्रमांक EC२२B०३८MH१९१५१० (SIA/MH/MIS/२३७२५१/२०२१) अंतर्गत पर्यावरणीय मंजुरी देण्यात आली आहे. मंजुरी पत्राची प्रत PARIVESH च्या अधिकृत वेबसाइट https://parivesh.nic.in/ वर उपलब्ध आहे.

चव्हाण सो. कोर्ट

# जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) यांचे न्यायालयात**
**दि. चौ.अर्ज क्र. ४०/२०२५ नि. ७/ड, ने.ता. २२/०७/२०२५**

१. श्री. वैभव गजानन ठाकूर — अर्जदार क्र. १
वयः ४५ वर्ष धंदाः नोकरी
२. श्रीमती सेगीता गजानन ठाकूर — अर्जदार क्र. २
वयः ६५ वर्ष धंदाः गृहिणी

**विरूध**

१. सौ. वैशाली प्रवीण गावंड — सामनेवाली क्र. १
वयः ४७ वर्ष धंदाः नोकरी
२. सौ. सुविधा नितेश पाटील — सामनेवाली क्र. २
वयः ३९ वर्ष धंदाः गृहिणी
३. सौ. दिपीका कुलदिप मांडेलकर — सामनेवाली क्र. ३
वयः ३६ वर्ष धंदाः गृहिणी

तमाम जनतेस नोटीसीद्वारे असे कलविण्यात येते की, अर्जदार क्र. १ यांचे वडिल, अर्जदार क्र. २ यांचे पती, व सामनेवाली क्र. १ यांचे वडिल, सामनेवाली क्र. २ यांचे वडिल, सामनेवाली क्र.. ३ यांचे वडिल, गजानन जनाबा ठाकूर हे दि. ०९/०९/२०२० रोजी आनत्या राहत्या घरी फ्लॅट नं. बी/१०१, रिधी सिध्दी हेरीटेज, प्लॉट नं. १०३, सेक्टर १४, कामोठे, पनवेल, रायगड, महाराष्ट्र ४१०२०९ येथे मयत झाले आहेत. मृत्यू समयी मयत गजानन जनाबा ठाकूर यांच्या सामाईक मालकीची व नावे असलेल्या मिळेतींचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतींचे वर्णन**

**मौजे. पनवेल, ता. पनवेल जि. रायगड येथील फ्लॅट नं. बी/१०१, पहिला मजला, रिधी सिध्दी हेरीटेज, प्लॉट नं. १०३, सेक्टर १४, कामोठे, पनवेल, रायगड, महाराष्ट्र ४१०२०९, सदनिकेचे क्षेत्रफळ ३८.१४० चौ. मी. आणि टेरेस- २.०४३ चौ. मी.**

त्यापेक्षा सदरहू अर्जदार हे सदरहू मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हा जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ही न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्कांबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदहू मयाताचे वारसाचे सर्टिफिकेट देईल.

आज दि. ११/०६/२०२५ राजी माझ्या सहीने व मे. न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

कोर्टाचा शिक्का

**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर, पनवेल**

# शिवसेना विभागप्रमुखपदी अमोल गोवारी तर शाखा प्रमुखपदी मयुरेश पाटील



पनवेल दि. ११ ( वार्ताहर ) : शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाच्या पनवेल प्रभाग क्रमांक २० च्या विभागप्रमुखपदी अमोल गोवारी तर प्रभाग १९ च्या शाखा प्रमुखपदी मयुरेश पाटील यांची नियुक्ती करण्यात आल्याने शिवसैनिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

पनवेल शहर शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात पार पडलेल्या कार्यक्रमात शिवसेना उपनेते सुरेंद्रनाथ माने,शिवसेना उपनेते बबनदादा पाटील, संपर्क प्रमुख प्रसाद भोईर ,जिल्हाप्रमुख शिरीष घरत ,उप जिल्हाप्रमुख रामदास पाटील ,युवासेना रायगड जिल्हा प्रमुख पराग मोहिते, युवासेना महानगर प्रमुख अवचित राऊत, शहर प्रमुख प्रवीण जाधव, शिवसेना शहर संघटिका अर्चना कुळकर्णी, उपशहर संघटक नंदकुमार घरत, मा. नगरसेवक अच्युत मनोरे, जेष्ठ शिवसैनिक जयवंत परदेशी,रणजित परदेशीं , प्रविण डावलेकर, वैभव मढवी ,जिवन मढवी,शाखा प्रमुख अलकेश जाधव, उपशाखा प्रमुख सुधीर मिसाळ, सर्वेश पवार, सनी मिसाळ आणि शिवसैनिक उपस्थित होते.

# चिरनेरला विकसित कृषी संकल्प अभियान कृषी शास्त्रज्ञांचे शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे मार्गदर्शन

**चिरनेर दि. ११ (दत्तात्रेय म्हात्रे) : बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी कृषी पूरक उद्योगांची जोड देत, शेती पद्धतीचा अवलंब करावा असा सल्ला प्रधान शास्त्रज्ञ डॉ. सनद कुमार यांनी दिला. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली, कृषी विज्ञान केंद्र रायगड, महाराष्ट्र विकसित कृषी संकल्प अभियाना मार्फत चिरनेर येथील ग्रामपंचायत कार्यालयात बुधवार (दि.११) जून रोजी शेतकऱ्यांसाठी कृषी शास्त्रज्ञांचे आधुनिक शेतीविषयक मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.**



यावेळी कृषी शास्त्रज्ञांनी शेतीला आधुनिक स्वयंपूर्ण बनवणे हे या अभियानाचे उद्दिष्ट असून, शेतीत नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून, वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगूनच शेतकऱ्यांनी शेती करावी असे आवाहन उपस्थित शेतकऱ्यांना केले. पूर्वी पाऊस पडल्यावर मातीला सुगंध येत होता. आता शेतीकडे दुर्लक्ष झाल्यामुळे हा वास येताना दिसत नाही. लोकसंख्या वाढली. मात्र शेतीचे क्षेत्र हे तेवढेच राहिले असताना आपण त्यात केमिकलचा वापर करून अधिक उत्पन्न घेत आहोत. आधुनिक काळात केमिकलचा वापर वाढला आहे. मात्र याचा परिणाम आरोग्यावर होत आहे. त्यामुळे पिकांना आवश्यक पोषक अन्नद्रव्य द्यावीत, जिवाणू मारू नका. गांडूळ आता दिसत नाही. हिरवळीची खते वापरा. युरियाचा वापर प्रमाणातच करावा. पाणी प्रमाणात कसे वापरावे, यासाठी तंत्रज्ञान आहे. पृथ्वीच्या सुरक्षिततेसाठी पर्यावरणीय समतोल आणि भुजल स्तोत्रांचे बळकटीकरण अत्यंत महत्त्वाचे असल्याचे शास्त्रज्ञ डॉ. सचिन कार्ले यांनी सांगितले. यावेळी शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद माउंवकर यांनी शेतकऱ्यांना विकसित व शिफारस केलेल्या विविध भात बियाणांची वैशिष्ट्यपूर्ण माहिती दिली. आणि अशीच बियाणी लागवडीखाली आणावी असे त्यांनी आवाहन करीत, माती परीक्षणाच्या नमुन्यांची देखील वैशिष्ट्यपूर्ण माहिती यावेळी त्यांनी दिली. खोडकिड्यासाठी खोलगट नांगरणी, पुरेसा ओलावा, कीटकनाशक फवारणी, व रोगाला बळी पडू नये म्हणून रोपांच्या मुळांना औषध फवारणी करावी. असा शास्त्रज्ञ डॉ. जीवन आरेकर यांनी शेतकऱ्यांना सल्ला दिला. तर शास्त्रज्ञ डॉ. रामटेके यांनी तरुणांनी शेतीकडे वळले पाहिजे तरच आपले भवितव्य चांगले राहील. सांगून, शेतीला निगडित शासनाच्या विविध योजनांचा उहापोह त्यांनी यावेळी केला. तसेच पारंपारिक बियाणे कालबाह्य झाली आहेत. त्यामुळे पोषणमूल्य असलेल्या भातजाती व बीजोत्पादनाची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

शाश्वत उत्पादन घेण्यासाठी येथील हवामान फळबाग लागवडीसाठी अनकुल आहे. त्यामुळे कृषी विभागामार्फत आंबा, काजू, नारळ, सुपारी, कोकम, फणस, आवळा, चिकू, जांभूळ, चिंच यासारख्या फळ पिकांची लागवड करावी. असे आवाहन उरण तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ नारनवर यांनी केले. याप्रसंगी व्यासपीठावर सरपंच भास्कर मोकल, महाराष्ट्र शासन शेतीनिष्ठ पुरस्कार प्राप्त शेतकरी प्रफुल्ल खारपाटील, पोलीसपाटील संजय पाटील, कृषी पर्यवेक्षक शिवाजी लोहकरे, कृषी पर्यवेक्षक अलका बरकुल, बी टी एम नमिता वाकळे, कृषी सहाय्यक सुषमा गायकवाड, शेतकरी बळीराम म्हात्रे, महेंद्र मोकल, अनिल केणी, भास्कर ठाकूर तसेच चिरनेरचे अन्य शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शेतकऱ्यांना भात बियाण्यांचे वाटप करण्यात आले.

# शेतकऱ्यांनी एकात्मिक शेती पद्धतीचा अवलंब करावा : डॉ. रवींद्र मर्दाने

**कर्जत दि. ११ (जयेश जाधव) : बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर कृषीच्या माध्यमातून शाश्वत उत्पन्न मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी भातानंतर भात ऐवजी भातानंतर भाजीपाला, भातानंतर कडधान्य ही पीक पद्धती अवलंबून त्यास कुक्कुटपालन, शेळीपालन,दुग्धव्यवसाय,मत्स्यपालन अशा कृषिपूरक उद्योगांची जोड देत यांत्रिकी पध्दतीचा वापर करीत एकात्मिक शेती पध्दतीचा अवलंब करावा, असा सल्ला कृषी विस्तार शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी दिला. प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र, तालुका कृषी अधिकारी कार्यालय आणि पंचायत समिती, कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने ' विकसित कृषी संकल्प अभियान ' अंतर्गत माणगाव तर्फे वरेडी या गावात आयोजित जनजागरण कार्यक्रमात ते बोलत होते.**




याप्रसंगी व्यासपीठावर कनिष्ठ भात पैदासकार डॉ. महेंद्र गवई, प्रभारी तालुका अधिकारी हेमांगी सपकाळे,पंचायत समितीचे कृषी अधिकारी संजय चव्हाण,कृषी विस्तार अधिकारी देविदास राठोड, मंडळ कृषी अधिकारी सचिन केने, उपकृषी अधिकारी मंगेश गलांडे उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ.मर्दाने यांनी विद्यापीठाने विकसित व शिफारस केलेल्या विविध भात बियाणांची वैशिष्ट्यपूर्ण माहिती देत शेतकऱ्यांनी त्याचीच लागवड करावी,असे आवाहन केले.शेतकऱ्यांच्या सशक्तीकरणासोबतच भारतीय कृषिला आधुनिक,स्वयंपूर्ण बनविणे,हे या अभियानाचे उद्दिष्ट असल्याने वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगून शेतकऱ्यांची पंढरी असलेल्या कृषी विद्यापीठांना शेतकऱ्यांनी भेटी द्याव्या व नवनवे तंत्रज्ञान जाणून घेऊन विविध शिफारसींची अंमलबजावणी करावी,असे त्यांनी नमूद केले.

यावेळी सचिन केने ,संजय चव्हाण, देविदास राठोड ,हेमांगी सपकाळे यांनी कृषिशी निगडित शासनाच्या विविध योजनांचा उहापोह करीत प्रस्तावांचे व दाव्यांचे बारकावे विशद केले.डॉ. गवई यांनी पोषणमूल्य असलेल्या भात जाती व ग्राम बीजोत्पादनबद्दल माहिती दिली.

# पळस्पे-पनवेल येथे सामुहिक ध्यान

पनवेल दि. ११ (प्रतिनिधी) : हिमालयन समर्पण ध्यान संस्कार (पनवेल ते रायगड) तर्फे रविवार, ८ जून रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत छत्रपती शिवाजी विद्यालय, पळस्पा येथे सामूहिक ध्यानाचे आयोजन करण्यात आले होते. पनवेल, नवीन पनवेल, कामोठा, पळस्पा, करंजाडे, शिवकर, उरण, गुळसुंदा, माणगाव आणि मुंबई सेंटर, हार्बर आणि वेस्टर्न येथील सुमारे ७०० साधकांनी त्याचा लाभ घेतला. आज प्रत्येक व्यक्ती तणावपूर्ण जीवन जगत आहे. अशा परिस्थितीत, ध्यान करून, एखादी व्यक्ती शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक प्रगती करून संतुलित जीवन जगू शकते.

**हे ध्यान जगभरात मोफत आहे.**

समूह ध्यान केल्याने सकारात्मक उर्जेचा प्रवाह निर्माण होतो जो व्यक्तीला लवकर संतुलित होण्यास मदत करतो. पनवेलमध्ये एक प्रयत्न करण्यात आला.






महाराष्ट्र शासन
सहकार विभाग

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. पनवेल यांचे कार्यालय**

पहिला मजला कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकार मार्ग, रायगड बाजाराच्या बाजुला, पनवेल, जि. रायगड ४१०२०६

दुरध्वनी क्रमांक :-०२२-२७४५२९८३ email:- arcspanvel@rediffmail.com

## जाहीर नोटीस

महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चे कलम १५४ (बी) २९ खाली दावा नोटीस

कमांडरस रिनायेन्सेस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. नेरे गाव, कोप्रोली गावाच्या बाजुला, ता. पनवेल, जि. रायगड, या संस्थेने या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम कलम १५४ (बी) २९ अन्वये खालील जाब देणार यांनी थकीत रकमेचा भरणा केला नसल्याचे नमुद करुन वसुल प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

त्यानुसार या कार्यालयात वेळी वेळी सुनावणी ठेवण्यात आली. तथापी खालील नमुद व्यक्तींना सुनावणी नोटीसची पोहोच होत नसल्याने नैसर्गिक न्याय तत्वानुसार म्हणजे दाखल करण्यासाठी जाहीर नोटीस देण्यात येत आहे. या जाहीर नोटीसीद्वारे आपणांस पुन्हा एक संधी देण्यात येत असुन सदर दाव्याबाबत अंतिम सुनावणी दिनांक ३०/०६/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता ठेण्यात आली असुन सदर सुनावणीस आपण स्वतः वा आपले प्रतिनीधी मार्फत उपस्थित रहावे. आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याचा निकाल केला जाईल व नंतर आपले कोणतेही म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही.

**मासिक सेवा शुल्काच्या थकीत रक्कमेचे वर्णन**

| अ. क्र. | दावा क्रमांक | प्रतिवादीचे नाव | पत्ता | थकीत रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | ३९०/२५ | श्री.तरुण रमेश छब्रिया | सी.७,२०२, दुसरा मजला, कमांडरस रिनायेन्सेस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. सर्व्हे नं.१६, हिस्सा नं.२/४, नेरे गाव, कोप्रोली गावाजवळ, ता. पनवेल, जि. रायगड, | १,१२,७६५/- |
| २ | ३९१/२५ | श्रीम.बेबी हरिप्रसाद कनोजिया | बी.१,२०३, दुसरा मजला, कमांडरस रिनायेन्सेस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. सर्व्हे नं.१६, हिस्सा नं.२/४, नेरे गाव, कोप्रोली गावाजवळ, ता. पनवेल, जि. रायगड, | ८७,९१९/- |
| ३ | ३९२/२५ | श्री.विनय कुमार समर सिंग | बी.१,३०३, तिसरा मजला, कमांडरस रिनायेन्सेस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. सर्व्हे नं.१६, हिस्सा नं.२/४, नेरे गाव, कोप्रोली गावाजवळ, ता. पनवेल, जि. रायगड, | २,०५,४७९/- |
| ४ | ३९३/२५ | श्री.विठठल मारुती मेदगे | बी.४,३०४, तिसरा मजला, कमांडरस रिनायेन्सेस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. सर्व्हे नं.१६, हिस्सा नं.२/४, नेरे गाव, कोप्रोली गावाजवळ, ता. पनवेल, जि. रायगड, | १,२२,९७२/- |
| ५ | ३९४/२५ | श्री दुर्गेश कुमार केशरवाणी | सी.३,१०१, पहिला मजला, कमांडरस रिनायेन्सेस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. सर्व्हे नं.१६, हिस्सा नं.२/४, नेरे गाव, कोप्रोली गावाजवळ, ता. पनवेल, जि. रायगड, | १,१२,६६८/- |

ही नोटीस माझे सही शिक्क्यानिशी दिली आहे.

ठिकाण- पनवेल
दिनांक : १०/०६/२०२५
जावक क्र. १४८७/२०२५

शिक्का

**(भारती काटुळे)**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था पनवेल,रायगड**

# वरिष्ठ पोलीस निरीक्षकाकडे उत्पन्नापेक्षा तब्बल २९७ टक्के अधिक मालमत्ता

नवी मुंबई दि.११ (वार्ताहर) : बांधकाम व्यावसायीकाकडुन ४ लाख रुपयांची लाच घेताना गत सफ्टेंबर महिन्यात रंगेहाथ पकडण्यात आलेल्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश कदम याने त्याच्या एकुण उत्पन्नापेक्षा तब्बल २९७ टक्के अधिक संपत्ती संपादित केल्याचे चौकशीत उघडकीस आले आहे. त्यानुसार मुंबई लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने सतीश कदम याच्या विरोधात उलवे पोलीस ठाण्यात अपसंपदा केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. एनआरआय पोलीस ठाण्याचा तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश कदम याला गत सफ्टेंबर महिन्यामध्ये महेश कुंभार या बांधकाम व्यावसायीकाकडुन ४ लाख रुपयांची लाच स्विकारताना मुंबई लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने उलवे येथून अटक केली होती. त्यावेळी एसीबीच्या पथकाने उलवे येथील त्याच्या फ्लॅट मधुन मोठी रक्कम देखील जप्त केली होती. प्राथमिक तपासात सतीश कदम याने गैरमार्गाने मोठ्या प्रमाणात संपत्ती जमवल्याचे आढळुन आल्याने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या महासंचालकाकडुन त्याच्या संपत्तीची उघड चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले होते.

त्यानुसार पोलीस दलात दाखल झाल्यापासून सतीश कदम याने अत्तापर्यंतच्या कालावधीत (१ डिसेंबर २०१३ ते ९ ऑक्टोबर २०२४) जमवलेल्या संपत्तीची तपासणी एसीबीच्या मुंबई युनिटचे पोलीस निरीक्षक कृष्णा मेखले व त्यांच्या पथकाने तपासणी केली. सहा महिने सुरु असलेल्या या तपासणीत सतीश कदम याने त्याच्या उत्पन्नापेक्षा तब्बल ३ कोटी ४८ लाख ४० हजार इतकी (२९७ टक्के) अपसंपदा केल्याचे आढळुन आले आहे. यावरुन तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश कदम याने नोकरीच्या कालावधीत पदाचा, अधिकाराचा गैरवापर करुन स्वत:च्या आणि कुटुंबाच्या नावावर गैरमार्गेने सदरची संपत्ती कमावल्याचे उघडकीस आले आहे.

माननीय बडगुजर साहेब यांच्या कोर्टात

अर्जदार तर्फे वकील
सौ. कुसुम किरण घरत
९९६७३३५०४६

## जाहीर नोटीस

**पनवेल येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात**

**दिवाणी चौकशी अर्ज क्र. ४६४/२०२५ नि.क्र.९/ड, ने.ता.१४/७/२०२५**

**1. MR. SUMANGAL BHAGIRATH BAGCHI, H/o. LATE HASI RANI BAGCHI**
Age-68 years, Occupation :- Retired
**2. MR. SUBRATHA SUMANGAL BAGCHI S/o. LATE HASI RANI BAGCHI**
Age-41 years, Occupation :- Service,
**3. MRS. SUHASINI VIVEK KULKARNI, D/o. LATE HASI RANI BAGCHI**
Age-43 years, Occupation :- Housewife
All are having address at : Room No,404, City Park CHS Ltd., Plot No.6-A, Sector-13, Khanda Colony, New Panvel, (W), Taluka- Panvel, District- Raigad. ....... **APPLICANTS**

वरील अर्जदार क्र. १ यांची पत्नी व अर्जदार क्र. २ व ३ यांची आई मयत हसी राणी बागची यांचे दिनांक २६/१२/२०२४ रोजी गाव कालुपुकुर, पो. जौग्राम, P.S.- जमालपुर, जिल्हा - पूर्बा, बर्धमान, पश्चिम बंगाल, येथे निधन झाले आहे. सदर मयताच्या नावे असलेल्या मिळकती खालीलप्रमाणे आहे :

**1. FLAT NO.404, ON THE FOURTH FLOOR, ADMEASURING 423 SQ.FTS. CARPET AREA EQUVALENT TO 510 SQ.FT. BUILT UP AREA, CITY PARK CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LIMITED, PLOT NO.6-A. SECTOR- 13, KHANDA COLONY, TALUKA - PANVEL, DISTRICT - RAIGAD.**

**2. 50% SHARE IN FLAT NO.01, ON THE GROUND FLOOR, ADMEASURING 26.11 SQ. MTRS, BUILT UP AREA, BUILDING NO. B-9, PRABODHAN CO-OPERATIVE SOCIETY LTD., PLOT NO.16, SECTOR- 11, KHANDA COLONY, NEW PANVEL (W), TALUKA- PANVEL, DISTRICT- RAIGAD.**

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळण्याकरीता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतींच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत ही जाहिरनोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होऊन दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदरहु न्यायालय वरील अर्जदारांना त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयताच्या मिळकतीं बाबत **वारस दाखला** देण्यात येईल व त्या नंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक ११/०६/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

**लिपीक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर**

कोर्टाचा शिक्का

**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर**

## पनवेल महानगरपालिका

### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | सुधीर रवजी कोटक (ठक्कर), प्लॉट नं. १६, आनंद, ५२ बंगलो हाउसिंग सोसा., पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड | ०१ नारळ झाड व ०१ जांभुळ तोडणे. | प्लॉट नं. १६, आनंद ५२ बंगलो हाऊसिंग सोसा., पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड या बंगलो च्या आवारातील ०२ झाडांना वाळवी लागली असुन, धोकादायक स्थितीत आहेत. |
| २. | मे. लक्ष्मीनारायण कंन्स्ट्रक्शन्स, ऐ-००१, तळमजला, शुभ दर्शन सोसायटी, प्लॉट नं. १५७-१६० सेक्टर ०९, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड | ०३ जंगली झाडे तोडणे. | प्लॉट नं. २२C (R), सेक्टर ०६, नवीन पनवेल (पू). ता. पनवेल, जि. रायगड या भूखंडाच्या आवारातील ०३ जंगली झाडे नविन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |
| ३. | मे. मंगलमुर्ती कन्स्ट्रक्शन्स, पनवेल तर्फे भागीदार सौ. श्वेता मुकुल वालावळकर, श्री. ओंकार को. ऑप. हौ. सोसायटी लि., फायनल प्लॉट नं. ५०/५, परदेशी आळी महाराणा प्रताप रोड, पनवेल. | ०२ अशोका, ०१ जांभूळ व ०१ उंबर अशी. एकूण, ०४ झाडे तोडणे. | श्री. ओंकार को ऑप हौ. सोसायटी लि., फायनल प्लॉट नं. ५०/५, परदेशी आळी, महाराणा प्रताप रोड, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथे भूखंडाच्या आवारातील ०४ झाडे नवीन इमारतीचे बांधकाम बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मूदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

सही/-
**(स्वरुप खारगे)**
**सहा आयुक्त (वृक्ष प्राधिकरण)**
**पनवेल महानगरपालिका**

# उत्तराखंड येथे होणाऱ्या ऑल इंडिया ओपन शूटिंग चॅम्पियनशिप साठी जासईच्या कुणाल पाटीलची निवड

**उरण दि. ११ (वार्ताहर) : नुकतेच ६ जून ते ९ जून दरम्यान २८वी कॅप्टन एस.जे. इझेकैल (एनआर) कॉम्पिटिशन स्पर्धा, महाराष्ट्र रायफल संघटना वरळी - मुंबई येथे संपन्न झाली. ह्या स्पर्धेत सिद्धांत रायफल आणि पिस्टल शूटिंग क्लब रायगड च्या ३१ नेमबाजानी रायगड जिल्ह्या तर्फे प्रतिनिधित्व केले होते** त्यामध्ये ५० मिटर रायफल प्रोन जुनिअर मेन मध्ये कुणाल पाटील जासई उरण,ह्यास सिल्वर मेडल, २५ मिटर स्टँडर्ड तसेच एमएएफसी स्पोर्ट्स पिस्टल, ५० मिटर फ्री पिस्टल मध्ये वेदांत किसन खारके नेरे पनवेल, ५० मिटर रायफल प्रोन पुरुष मध्ये गौरव ठाकूर चिरनेर उरण कान्स्य पदक, दिग्विजय चौगुले, पार्थ, तोडकर ,५० मिटर रायफल जु. वूमन मध्ये वैभवी बिष्ट हिस सिल्वर,कार्तिकी देऊळेकर, व वरा देऊळेकर ,५० मिटर प्रोन रायफल मेन मध्ये नंदकुमार माने ठाणे अंमलदार बेलापूर, ५० मिटर रायफल मास्टर मेन मध्ये राजू मुंबईकर वेश्वी उरण,५० मिटर फ्री पिस्टल शुभम पुसलकर आणि दुर्गा जाधव, ५०मिटर ओपन साईट रायफल मध्ये करण बेहेर सिल्वर व मयुरेश सावंत ला कान्स्य, सागर वैगनकर तसेच शॉट गन ट्रॅप मध्ये अवनी कोळी,दिघोडे उरण सिल्वर मेडल, वरा देऊळेकर,व कार्तिकी देऊळेकर डबल ट्रॅप ह्या सर्वांची ७जुलै रोजी देहरादून उतराखंड येथे होणाऱ्या इंडिया ओपन शूटिंग चॅम्पियनशिप साठी निवड झाली आहे.




कुणाल पाटील आणि गौरव ठाकूर ह्यांस महाराष्ट्र रायफल संघटने च्या सेक्रेटरी शिला कानूगो मॅडम व अध्यक्ष अशोक पंडित सर ह्यांच्या हस्ते पदक देवून सन्मानित करण्यात आले. त्यांच्या यशाबद्दल त्यांचे क्लब चे सेक्रेटरी रायगड भूषण राष्ट्रीय नेमबाज किसन खारके, प्रशिक्षक अलंकार कोळी, राल्स्टन कोयलो,क्लब चे सदस्य अजिंक्य चौधरी,समाधान घोपरकर, अविनाश भगत,प्रकाश दिसले सुनील मढवी, समीर अंबवणे, नंदकुमार मुंबईकर तसेच मित्र परिवार ह्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेबद्दल शुभेच्छा दिल्या आहेत.

# के.ई.एस. इंदुबाई वाजेकर शाळेत समर कॅम्पचा प्रमाणपत्र वितरण समारंभ



**पनवेल दि. ११ (प्रतिनिधी) : दि. १० जून २०२५ रोजी के.ई.एस. इंदुबाई वाजेकर शाळेत WNS Cares Foundation आणि सेवा सहयोग फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कम्युनिटी नॉलेज सेंटर प्रकल्पांतर्गत समर कॅम्पचा प्रमाणपत्र वितरण समारंभ उत्साहात पार पडला.**



समर कॅम्पमध्ये विद्यार्थ्यांना रोबोटिक्स, संगणक, वैदिक गणित, वैज्ञानिक प्रयोग, बौद्धिक विकास व इंग्लिश स्पीकिंग यांसारखे कोर्स शिकवण्यात आले. या कार्यक्रमास २०० विद्यार्थी व त्यांचे ४० पालक उपस्थित होते. या कार्यक्रमास सुधीरजी पटेल (सेवा सहयोग फाउंडेशनचे संचालक), रविकांत अल्टेकर (BARC वैज्ञानिक), रसिका गुंजल (WNS Cares Foundation - ग्रुप मॅनेजर) आणि लतिका खोत (WNS Cares Foundation - {dûcofH$) यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात कॅम्पच्या आठवणींवर आधारित व्हिडिओ प्रेक्षणाने झाली. त्यानंतर दीपप्रज्वलन व रोप भेट देऊन मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. सुधीरजी पटेल यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनानंतर, विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या अनुभवांची आणि कृतज्ञतेची मनमोकळी अभिव्यक्ती केली. कार्यक्रमाचा समारोप सुषमा शिंदे यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. हा समारंभ विद्यार्थ्यांच्या शिकवणी, अनुभव व सन्मानाचा आनंददायी सोहळा ठरला

# पक्षीप्रेमी दिलीप कोकाटे यांनी दिले कबुतराला जीवदान



पनवेल दि.११(वार्ताहर): वडाला बांधलेल्या धाग्यात पाया अडकून पडलेल्या कबुतराला पक्षीप्रेमी दिलीप कोकाटे यांनी जीवदान दिले आहे. वटपौर्णिमेच्या निमित्ताने वडाच्या झाडाला बांधलेल्या धाग्यात एका कबुतराचा पाय अडकून तो हालहाल करत होता. ही दुर्दशा पक्षीप्रेमी दिलीप कोकाटे यांच्या लक्षात येताच त्यांनी तात्काळ त्या ठिकाणी जाऊन तिथे असलेल्या पुष्पा आवटे यांना सोबत घेऊन धागा सोडवला आणि त्या कबुतराला जीवदान दिले. दिलीप कोकाटे यांनी संयम, काळजी आणि माया दाखवत कबुतराला सुरक्षितरीत्या मुक्त केले. नागरिकांनी त्यांच्या या कृत्याचे कौतुक केले असून, धार्मिक कार्य करताना निसर्ग आणि प्राणिमात्रांची काळजी घेण्याचे महत्त्वही या घटनेतून अधोरेखित झाले आहे.

# एसीला शॉर्ट सर्किटमुळे आग सेल्स ऑफिस आगीच्या भक्षस्थानी

**पनवेल दि.११(वार्ताहर): एसीला शॉर्ट सर्किट मुळे आग लागून सेल्स ऑफिस आगीच्या भक्षस्थानी गेल्याची घटना पळस्पे फाटा येथील साई वर्ल्ड सिटी इमारतीच्या आवारात घडली आहे.**

पळस्पे फाटा येथे साई वर्ल्ड सिटी ही मोठी इमारत आहे.या इमारतीच्या आवारात सेल्स ऑफिस आहे.या ऑफिसमधील एसीजवळ सकाळी साडे नऊ च्या सुमारास शॉर्ट सर्किट झाले.या शॉर्ट सर्किट मुळे ऑफिस ला आग लागली. या आगीचे वृत्त पनवेल महानगरपालिकेच्या पनवेल आणि नवीन पनवेल अग्निशमन दलास समजली.त्यांनी तातडीने सदर ठिकाणी धाव घेतली. तेव्हा स्मोक व्हेंटिलेशन होण्याकरता तडा गेलेल्या काचा तोडण्यात आल्या.अग्निशमन बंबाच्या



सहाय्याने ही आग आटोक्यात आणण्यात आली.यासाठी नवीन पनवेल येथील उप अग्निशमन अधिकारी अतुल सकपाळ, अग्निशमन विमोचक प्रमुख मंदार म्हात्रे, यंत्र चालक श्रीकांत आढाऊ, अग्निशामक अविनाश भालेराव,विशाल राऊत,प्रतिक गाडगे, पल्लवी जागले, पनवेल अग्निशमन दलाचे वैभव ओंबासे, मन्सूर,सुदीप ठाकूर, तनय पडवळ,कृष्णा नरवटे, एकनाथ बागूल, मितेश तारेकर आदींनी प्रयत्न केले.

पान १ वरुन पुढे चालू

# जिल्ह्यातील शाळांमध्ये १६ जूनला प्रवेशोत्सव

तोरणे लावण्यात येणार आहेत. रांगोळ्या काढण्यात येतील. विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांमार्फत स्वागत करण्यात येणार आहे. काही ठिकाणी विद्यार्थ्यांना पुष्प देऊन स्वागत करण्यात येईल. गावात, वार्डात प्रभातफेरी काढण्यात येईल. या प्रभातफेरीत युवक, गावकरी, जेष्ठ नागरिकांना सहभागी होण्याची विनंती करण्यात येणार आहे. तसेच शाळेच्या पहिल्या दिवशी जिल्हस्तरीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भेटीचे नियोजन करण्यात आले आहे. वर्षभर १०० टक्के उपस्थिती ठेवण्यासाठी करावयाच्या प्रयत्नांची माहिती देणे तसेच एकही विद्यार्थी शाळेबाहेर राहणार नाही अशी उपस्थितांसह प्रतिज्ञा घेण्यात येणार असल्याची माहिती प्राथमिक शिक्षण विभागाने दिली आहे.

# महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असो. रायगड जिल्हा अध्यक्षपदी अॅड. नागेश हिरवे

आणि गरजू लोकांना मोफत न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी सहकार्य केले आहे. तसेच पर्यावरण क्षेत्रात त्यांचे उल्लेखनीय कार्य आजही चालू आहे. नुकतीच केंद्र सरकारतर्फे संपूर्ण भारतात मोठ्या संख्येने नवीन नोटरी वकिलांची नियुक्ती झाली आहे. परंतु तांत्रिक अडचणीमुळे बऱ्याच नवनियुक्त नोटरी वकिलांना त्यांचे नोटरी लायसन मिळवण्यासाठी अडचणी येत होत्या. या तांत्रिक अडचणी सोडवून संपूर्ण महाराष्ट्रातील बऱ्याच नवनियुक्त नोटरी वकिलांना नोटरी लायसन मिळवून देण्यासाठी अॅड. नागेश हिरवे यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. त्यांच्या या विशेष कार्याची दखल घेत महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशन तर्फे त्यांची रायगड जिल्हा अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे. भविष्यात जुन्या व नवीन नोटरी बांधवांना नोटरी सेवा देताना येणाऱ्या अडीअडचणी तसेच या क्षेत्रातील विविध प्रलंबित प्रश्न, समस्या महाराष्ट्र अँड गोवा नोटरी असोसिएशनच्या माध्यमातून केंद्र सरकारपर्यंत मांडून त्या मार्गी लावण्याचे काम करणार असल्याचे अॅड. नागेश हिरवे यांनी सांगितले. त्यांच्या या नियुक्तीबद्दल पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष अॅड. मनोज भुजबळ साहेब यांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले.

# कामगार नेते शाम म्हात्रे यांच्या पुण्यस्मरण दिनी महिला आरोग्य तपासणी शिबिर

यांनी केली होती. ती मागणी आज दिल्ली दरबारी पडून आहे. त्यासाठी त्यांनी पक्ष मतभेद बाजूला ठेवून लोकनेते दि. बा पाटील यांचे नाव कसे देण्यात येईल यासाठी जीवाचे रान केले असते.असेही यावेळी श्रुती म्हात्रे म्हणाल्या. यावेळी विविध मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून दिवंगत कामगार नेते शाम म्हात्रे यांना भावपुर्ण श्रद्धांजली वाहिली.

कामगार नेते शाम म्हात्रे यांच्या पुण्यस्मरण दिनी महिला आरोग्य तपासणी शिबिर, नेत्र तपासणी शिबिर आणि कर्क तपासणी शिबिर आणि कर्क रोगावर व्याख्यान चे आयोजन केले होते. या शिबिराचा लाभ मोठ्या संख्येने महिला भगिनीने घेतला. या कार्यक्रमासाठी काँग्रेसचे जेष्ठ नेते आर सी घरत, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत,काँग्रेसचे पनवेल जिल्हा अध्यक्ष सुदाम पाटील, ओ बी सी सेलचे कोकण विभाग अध्यक्ष शंभू म्हात्रे, युवक काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष हेमराज म्हात्रे, कांतिभाई गंगर, कल्पेश गंगर, परीक्षित ठाकूर, वैजनाथ ठाकूर आदीसह मोठ्या संख्येने शाम म्हात्रे यांच्या चाहत्यांनी गर्दी केली होती.

# तनेएराने जाहीर केली पहिल्यांदाच साडीवर ४० टक्के सवलत योग्य, आकर्षक किमतीत विविध प्रकारच्या पारंपारिक पोशाखांची व्यापक श्रेणी

**पनवेल दि. ११ (प्रतिनिधी) : टाटाचा ब्रँड असलेल्या तनेएराने आर्थिक वर्ष २०२५ मध्ये सुमारे तीस टक्के वाढ नोंदवली असून आर्थिक वर्ष २६ च्या सुरुवातीलाही लग्नसराईच्या मजबूत खरेदीचा प्रभाव आहे. त्यातून ब्रँडच्या वाढीचा कल, प्रवाह कायम राहत आहे. या सकारात्मक प्रवासास चालना देततनेराने आपल्या पहिल्यावहिल्या राष्ट्रीय सेलची घोषणा केली आहे. त्यामध्ये साड्या, रेडी-टू-वेअर सेट्स, अनस्टीच्ड कुर्ता सेट्स आणि सणासुदीसाठीच्या लेहेंगासारख्या विविध श्रेणींमध्ये तयार केलेल्या शुद्ध व नैसर्गिक धाग्यांपासून बनवलेल्या उत्पादनांवर ४० टक्के पर्यंत सवलत दिली जात आहे.**




४१ शहरांमध्ये ८० दालनांचे मजबूत राष्ट्रीय जाळे असलेल्या तनेएराने पारंपरिक वस्त्रप्रावरण परिधानसाठी प्रमुख पर्याय म्हणून आपले स्थान अधिक दृढ केले आहे. यावर्षी सणासुदीचा हंगाम लवकर सुरु होत असताना हा सेल या हंगामाची सुरुवात झाल्याचे जाहीर करण्यासाठी आणि ग्राहकांना तनेएराच्या वैशिष्ट्यपूर्ण डिझाइन ठळकपणे सिद्ध करणाऱ्या शुद्ध आणि अस्सल उत्पादनांचा संग्रह करण्याची संधी देण्यासाठी आयोजित करण्यात आला आहे.या प्रसंगी बोलतानामुख्य विक्री आणि विपणन अधिकारी सोमप्रभ कुमार सिंगम्हणाले, पहिल्यांदाच इतक्या विस्तृत श्रेणीवर आम्ही एवढी सवलत देत असून उत्पादने ४० टक्केपर्यंत सवलतीत उपलब्ध आहेत. ही सवलत योजना म्हणजे तनेएरा ब्रँड ज्यासाठी ओळखला जातो त्या शुद्धता व समृद्धतेच्या अनुभवाबरोबर मिळणारा एक अतिरिक्त लाभ आहे. अस्सलरीत्या मिळवलेली हस्तकला उत्पादने तसेच प्रत्येक पोषाखात मिळणारी शुद्धतेची आणि गुणवत्तेची हमी याद्वारे आमच्या चोखंदळ ग्राहकांसाठी हा अनुभव खास बनविण्याचे आमचे ध्येय आहे.बनारसी, कांजीवरम, जामदानी ते टसर यांसारख्या विविध प्रकारच्या साड्या ब्रँडच्या पोतडीत असून त्या भारतातील विणकाम परंपरा जपणाऱ्या कारागिरांना एक सलाम आहे.

प्रत्येक तनेएरा दालन साडीप्रेमींसाठी एक निवासस्थानासारखे डिझाइन केलेले असूनयेथे लग्नासाठी विशेष विभाग, सणासुदीच्या कार्यक्रमाच्यावेळी परिधान करायच्या कपड्यांचा वेगळा विभाग आणि रोजच्या वापरातील आवश्यक गोष्टी एकाच छताखाली उपलब्ध आहेत. ग्राहकांसाठी सिल्क, कॉटन इकत, कोटा डोरिया, चंदेरी आणि महेश्वरी, साउथ सिल्क्स, संबळपुरी आणि व्हेगन कलेक्शन्ससारख्या विविध विणकाम केंद्रांमधून खास निवडलेली उत्पादनेही उपलब्ध आहेत. हर एक पोषाखातून भारताच्या समृद्ध वस्त्र परंपरेचा गौरव करत गुणवत्तेच्या बाबतीत तडजोड न करणाऱ्या तनेएरा कडून अस्सल कारागिरीचे चिन्ह म्हणून शुद्ध झारी कांजीवरम' असे प्रमाणपत्र दिले जाते.ग्राहक नवी मुंबईतीलइनऑरबिट मॉल येथील तनेएरा शोरूम मध्ये ही सवलत घेऊ शकतात.


## जाहीर नोटीस

सर्व लोंकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आमच्या अशिलांनी खालील प्रमाणे वर्णन केलेली जमिन मिळकती, जमिन मिळकतीचे मालक १) श्री. वासुदेव गणा फुलोरे, रा. वावंजे, ता. पनवेल, जि, रायगड, २) सौ. इंदीरा बाळाराम पाटील, रा. वलप, ता. पनवेल, जि. रायगड, यांचेकडून विक्रीच्या कराराने कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदरहू जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वावंजे, ता. पनवेल, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ५८ | ४ | ०.३२.१० | ४.१९ |

तरी सदरहू मिळकतीवर वा तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, समजोता करार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तीनी अथवा संबंधीतांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात, वरील मुदतीत कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरून त्यावर कोणाचीही, कोणत्याही प्रकारची हरकत, हक्क अगर हितसंबंध नाही असे समजून आमचे अशील सदर मिळकतीच्या विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १२/०६/२०२५

सही/-
**अॅड.के.आर.भोईर**
बी.ए.एल.एल.बी.
यशोकिरण, ऑफिस नं.५, पहिला मजला,लोखंडीपाडा, वीर सावरकर पुतळ्याजवळ, पनवेल-४१०२०६.


# ट्रकला लागली आग, ट्रकचा पुढील भाग जळाला

नवीन पनवेल दि. ११ : करंजाडे रेल्वे फाटकाच्या वरील हायवेवर ट्रकला दहा जून रोजी रात्रीच्या सुमारास आग लागली. या आगीत ट्रकचा पुढील भाग जळाला आहे. अग्निशामक दलाने ही आग विझवली.



१० जून रोजी रात्री सव्वा नऊ ते साडेनऊच्या दरम्यान ट्रक क्रमांक एम एच ४३ वाय ७३३१ या वाहनाला आग लागली. या आगीची माहिती पनवेल अग्निशामक दलाला देण्यात आली. घटनास्थळी अग्निशामक दल पोहोचले. या आगीवर होजरील होजच्या सहाय्याने पाणी मारून ही आग विझवण्यात आली. यावेळी या आगीत ट्रकचा पुढील भाग जळून खाक झाला. सुदैवाने यात कोणतीही जीवित हानी झाली नाही मात्र ट्रकचे मोठ्या नुकसान झाले आहे.

# के.गो.लिमये वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळेत बदल

पनवेल दि. ११ : के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयाच्या सर्व सभासदांना कळविण्यात येत आहे कि, शुक्रवार दि. १३ जून २०२५ पासून वाचनालयाच्या कामकाजाची वेळ खालील प्रमाणे करण्यात आली आहे पुस्तक देव-घेव विभाग: सकाळी ९.०० ते सायंकाळी ८.०० पेपर वाचन विभाग: सकाळी ९.०० ते दुपारी १२.०० सायंकाळी ४.०० ते ८.०० जेवणाची वेळ: दुपारी १.०० ते २.०० साप्ताहिक सुट्टी: मंगळवार कृपया सर्व वाचकांनी याची नोंद घ्यावी. कार्यवाह के गो लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय, पनवेल पत्ता: पनवेल-उरण आगरी समाज मंडळ, तळमजला दी. बा. पाटील शाळेसमोर, दांडेकर हॉस्पिटलच्या बाजूला. पनवेल.


**रायगड जिल्हा आणि नवी मुंबईचे अग्रेसर वृत्तपत्र**
किल्ले रायगड
**सर्व प्रकारच्या जाहिरातींसाठी एक सर्वोत्कृष्ठ प्रभावी माध्यम**
**प्रदिप वालेकर ९८१९४७०१४०**
**प्रमोद वालेकर ९८६९६८८४५३**


दैनिक किल्ले रायगड या वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या जाहीरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्या संदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी दैनिक किल्ले रायगड घेणार नाही. दैनिक किल्ले रायगड या वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहनिशा वाचकांनीच करुन संबंधितांशी व्यवहार करावेत. त्या संदर्भात प्रसिध्द झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी दैनिक किल्ले रायगड चे मालक मुद्रक,प्रकाशक व संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक किल्ले रायगडच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. : **संपादक**

हे वृत्तपत्र मालक मुद्रक, प्रकाशक व संपादक प्रमोद लक्ष्मण वालेकर यांनी सिध्दकला प्रिंट मिडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून दैनिक किल्ले रायगड कार्यालय, १०/११ साहील सोसायटी, सिटी पोस्ट ऑफीस समोर, एम. पी. रोड, पनवेल ४१० २०६, ता. पनवेल, जि. रायगड (महाराष्ट्र), येथे प्रकाशित केले. कार्यालयीन फोन नं. :(022) 2745 9673, Email: killeraigad @ gmail. com. ❐ RNI Regn. No. 16725/67.